2.4.6 (3)

**वैभव शिक्षण संस्था**

**कॉलेज ऑफ एज्युकेशन (बी. एड), विटा.**

ता- खानापूर जि-सांगली

## शालेय अंतरावासिता अहवाल

शैक्षणिक वर्ष 2021-22 मधील द्वितीय वर्षातील तिसरे सत्रामधील प्रशिक्षणार्थीची सहा आठवड्यांची आंतरवासिता दिनांक 31/12/2021 से 21/01/2022 या कालावधीत आयोजित करण्यात आली होती. प्रस्तुत आंतरवासिते मध्ये 06 शाळांची निवड करण्यात आली होती यामध्ये एकूण 54 विद्यार्थ्यांची 06 गटात विभागणी करण्यात आली होती. महाविद्यालयातील मार्गदर्शक प्राध्यापकांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षणार्थनि ही तीन आठवड्याची आंतरवासिता पूर्ण केली.

या आंतरवासितेसाठी जाणाऱ्या प्रशिक्षणार्थीना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विद्यादेवी रमेशराव पाटील मॅडम यांनी मार्गदर्शन केले. त्याचबरोबर आंतरवासिता विभाग प्रमुख प्रा. वरघट एम. डी. यांनी विद्यापीठाने ठरवून दिलेल्या सेमिस्टर 03 मधील प्रात्यक्षिक कार्याची ओळख करून दिली.

या आंतरवासितेमध्ये प्रशिक्षणार्थींनी 04 संगणक पाठ, कृती पाठ 06, विविध अध्यापन पद्धतीनुसार 08, ज्ञानरचनावाद पाठ 10, बुलेटिन पाठ 10 तर 20 अध्यापन पद्धतीनुसार सलग सराव पाठ असे एकूण 58 सराव पाठ या आंतरवासिता पूर्ण केले, तसेच या आंतरवासितेमध्ये काही प्रात्यक्षिक पूर्ण केली त्यामध्ये भाषा कौशल्य विकसनासाठी एका वर्गासाठी योग्य उपक्रमाची निवड करून अहवाल लेखन केले. प्रोजेक्ट बेसड लर्निंग /सांधिक अध्यापन /सहकार्यात्मक अध्यापन / ICT वर आधारित पाठाचे नियोजन करून वृतांत लेखन केले. व शाळेतील एका अनुभवी शिक्षकाच्या पाठाचे निरीक्षण केले. समाजसेवा /आर.एस.पी./ लर्न गाईड / स्काऊट/आपत्ती व्यवस्थापन यापैकी एका उपक्रमाचे नियोजन केले कार्यवाहीचा वृतांत लिहिला. प्रशिक्षणार्थीनी एका मानसशास्त्रीय कसोटीचा एका वर्गावर वापर करून वृतांत लिहिला. सहा आठवड्यांच्या शालेय अनुभव कालावधीत येणारे विशेष दिन, दिनविशेष, यांचे आयोजन केले. शाळेतील एका विद्यार्थ्यांचा व्यक्ती अभ्यास करून त्याचे संकलित नोंदपत्रक तयार केले. एका वर्गासाठी सर्वकष सातत्यपूर्ण मूल्यमापन साधनापैकी एका साधनाची निवड करून विद्यार्थाचे मूल्यमापन केले. प्रशिक्षणार्थीनी एका वर्गासाठी अध्यापन पद्धतीनुसार आशयाची निवड करून शैक्षणिक साधनाचा वापर करून त्याची परिणामकता तपासून पाहिली. प्रशिक्षणार्थीनी परिपाठ अथवा तणाव व व्यवस्थापन कार्यक्रमाचे आयोजन करून प्रत्यक्ष कार्यवाही केली. प्रत्येक प्रशिक्षणार्थीनीआपल्या अध्यापन पद्धतीनुसार अवांतर माहिती व कौशल्य विकासाठी एका उपक्रमाची निवड केली. अशा पद्धतीची सर्व प्रात्यक्षिक या आंतरवासीतेमध्ये पूर्ण केली.

या आंतरवासीतेमध्ये सर्व प्राध्यापकांनी आपल्या आपल्या गटाला योग्य मार्गदर्शन करुन आन्तरवसिता पूर्ण केली.

Vaibhav Shikshan Sanstha, Vita
College of Education
Tal.Khanapur,Dist-Sangli

**Principal**
Vaibhav Shikshan Sanstha
Sanchlit
College of Education,Vita
Tal.Khanapur,Dist.Sangli